जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४३६ दिनांक - १४/१०/२०२४**

भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन पुणे शहर

## नागरीकांमध्ये दहशत पसरुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारे आरोपींना अटक

दि.०८/१०/२०२४ रोजी अय्यप्पा स्वामी मंदिरासमोर,जुनी दुग्गड चाळ,संतोष नगर,कात्रज,पुणे या ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे मामाचा मुलगा याच्यासह रास दांडीयाचा कार्यक्रम पाहत असताना आरोपी अमीत चोरगे व त्याचे मित्र व त्यांचे सोबतचे इतर तीन ते चार साथीदार यांनी दहशत करण्यासाठी त्यांचे हातातील लोखंडी धारदार हत्यारे हवेत फिरवुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे हातातील लोखंडी धारदार हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यावर,डावे कानावर व पाठीवर सपासप वार करुन गंभीर जखमी केले आहे म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न.८३०/२०२४,भारतीय न्याय संहीता कलम १०९,३५२,३५१(२),१८९(२),१८९(४),१९१(२),१९३(३),१९० आर्म ॲक्ट ४,२५ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५,क्रिमीनल लॉ अमेंन्टमेंन्ट ॲक्ट ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील यांनी गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेबाबत तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.मा.वरीष्ठांचे सुचनांप्रमाणे तपास पथकातील अंमलदार **सागर बोरगे,मितेश चोरमोले, अभिनय चौधरी** यांना आरोपी हे कात्रज घाटामध्ये थांबले असल्याची बातमी मिळाली.त्याप्रमाणे भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी कात्रज घाटामध्ये सापळा रचुन आरोपी **१.अमित दिपक चोरघे,वय २७ वर्षे, रा.आंबेगाव खु,पुणे २. अजय किसन रांजणे, वय २६ वर्षे, रा.जैन मंदीराजवळ,आंबेगाव खु,पुणे ३. प्रसाद दत्तात्रय रांजणे,वय २२ वर्षे, रा. दुगड शाळेचे मागे,आंबेगाव खु,पुणे ४. अक्षय किसन सावंत,वय २८ वर्षे, रा.सच्चाईमाता,आंबेगाव खु,पुणे ५. सिध्देश शिवाजी सणस,वय २६ वर्षे, रा.संभाजी राजे मित्र मंडळाजवळ,आंबेगाव खु,पुणे ६.विजय रघुनाथ रांजणे,वय १९ वर्षे,रा.जैन मंदीराजवळ,आंबेगाव खु,पुणे यांना ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भारती विदयापीठ पोलीस स्टेशन श्री.डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर कदम, समीर शेंडे, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमाले, अवधुत जमदाडे, सागर बोरगे, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश ढमढेरे, हनमंत मासाळ, मंगेश पवार, निलेश जमदाडे, सतिश मोरे, नवनाथ भोसले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे यांच्या पथकाने केली आहे.